आज दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११.३० वा. मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी विभागात आयोजित करण्यात आली. या सभेत द्वितीय सत्राचे नियोजन करण्यात आले. या सभेत खालील प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे
डॉ. संजय शिंदे
प्रा. हंसराज भोगे
प्रा. प्रतिक्षा खरडे
प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे

विषय क्र. १ - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम सत्राचा आढावा डॉ. संजय शिंदे यांनी घेतला. मराठी विभागातील पदवी व पदव्युत्तर विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि घेतलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या पहिल्या सत्रात मा. बाळासाहेब बोंगडे, प्रा. प्रतिक्षा खरडे, मा. सुदेश भाटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अर्जलेखन कार्यशाळा, पुस्तक वाटप, वाचन प्रेरणा दिन उपक्रम, फिल्ड व्हिजीट, मराठी विकिपीडिया परिचय कार्यशाळा, दिवाळी अंक वाटप, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले

विषय क्र. २ - या शैक्षणिक वर्षात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी 'वाचकवीर पुरस्कार' देण्याचे ठरले. त्या संदर्भात चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ३ - पहिल्या सत्राच्या अभ्यासक्रम पूर्तता अहवालावर चर्चा करण्यात आली. विद्यापीठ परिक्षा, द्वितीय वर्षाचे/अभ्यास. सत्राचे अध्यापन, अंतर्गत गुण, पदव्युत्तर विभागाचे नियोजन या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ४ - एक्स्ट्रा लेक्चर संदर्भात चर्चा झाली. मराठी विभागाने घेतलेल्या अधिकच्या (सुट्टीच्या दिवशी) तासांची चर्चा झाली.

द्वितीय सत्रात मराठी भाषा पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिनाची चर्चा होऊन सभा समाप्त झाली.

मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.